IMPACT FACTOR
5.473(SJIF)
UPA NATIONAL E-JOURNAL
Interdisciplinary Peer-Reviewed IndexedJournal
ISSN
2455-4375

# गुरुमोल मंत्र जाणावा !

**डॉ. तनुजा नाफडे**
प्रभारी प्राचार्य, संगीत विभागप्रमुख
आर.एस.मुंडले धरमपेठ कला व वाणिज्य
महाविद्यालय, नागपूर.
9823013755
tanujanafde@gmail.com

**गोषवारा :-**

कलेच्या क्षेत्रात गुरुचे स्थान अतिशय उच्च आहे, अमूल्य आहे. गुरुला आई, माऊली असे संबोधले जाते. ज्ञानाचा मार्ग दाखवणारा, अतिशय प्रेमळ, उदार अंतःकरणाचा, सहृदयी, आपले जीवन उजळून टाकणारा असा गुरु मिळणे कठीण असते. संगीत ही गुरुमुखी विद्या आहे. पुस्तकांच्या आधारे संगीतकला किंवा इतर कोणतीही कला आत्मसात करता येत नाही. त्यासाठी गुरुंच्या प्रत्यक्ष समोर बसून प्रत्येक स्वराची कंठात मांडणी करावी लागते. भारतीय शास्त्रीय संगीत क्षेत्रात, विशेषतः गायनाच्या क्षेत्रात ज्या गुरुंचे योगदान अतुलनीय आहे.

संगीत विज्ञानच आहे. पण त्याच्या क्रियात्मक ज्ञानाच्या अभावाने त्याची सृजनशीलता पटवून देण्यासाठी अधिक सखोल संशोधनाची गरज आहे. पण अशी साधने निर्माण होऊनदेखील संगीताच्या क्षेत्रात गुरुचे स्थान उच्च शिखरावरच आहे. गुरु हा शिष्याला आपल्यासमोर बसवून संगीताचे ज्ञान देतो. सोबतच संगीताचे संस्कारही करतो. एखाद्या शिष्याद्वारे कलाकृती निर्माण होण्यासाठी, कलाविष्कार घडण्यासाठी शिष्याबरोबरच गुरुचे कष्टही महत्त्वाचे असतात. गुरुंचे गुण, त्यांचे माहात्म्य ही अनुभवण्याची गोष्ट आहे.

---

‘ ध्यानमूलं गुरुमूर्ती
पूजामूलं गुरुपदम
मंत्रमूलं गुरुर्वाक्यं
मोक्षमूलं गुरुकृपा ’

या श्लोकाची महती योग्य गुरुच्या सान्निध्यात आल्यावरच कळते. अध्यात्मिक आणि कलेच्या क्षेत्रात गुरुचे स्थान अतिशय उच्च आहे, अमूल्य आहे. गुरु म्हणजे साक्षात परब्रम्ह! जिथे गुरुने बोट धरुन मार्गदर्शन करायचे अशी ही दोन्ही क्षेत्रे आहेत. संत कबीर म्हणतात, ’गुरु व परमेश्वर दोघांना वंदन करताना प्रथम वंदन गुरुला!’ कारण त्याच्या कृपेने परमेश्वराची प्राप्ती होते. गुरुला आई, माऊली असे संबोधले जाते. ज्ञानाचा मार्ग दाखवणारा, अतिशय प्रेमळ, उदार अंतःकरणाचा, सहृदयी, आपले जीवन उजळून टाकणारा असा गुरु मिळणे कठीण असते. म्हणतात ना, ‘गुरुला चांगला शिष्य व शिष्याला चांगला गुरु मिळणे दुर्लभच असते. चांगला गुरु सर्वप्रथम चांगला शिष्य असायला हवा.’

आपल्या सर्वांचा आद्य गुरु कोण असेल? असा प्रश्न केल्यास त्याचे अचूक उत्तर कोणीही देऊ शकत नाही. कारण तो आपणा सर्वांना कळत-नकळत सदैव व सातत्याने ज्ञानदान करीत असतो. तो गुरु म्हणजे निसर्ग! या निसर्गातूनच सर्व सजीवांची निर्मिती होते. पृथ्वी, जल, आकाश, वायू, तेज या पंचतत्त्वांशी एकनिष्ठ राहून मानवाने निसर्गाची सेवा कुठल्याही फळाची आशा न ठेवता करायला हवी. त्याचे रक्षण, संवर्धन ही काय फक्त

शासनाची जबाबदारी आहे का? आणि शेवटी शासन म्हणजे कोण? आपणच ना? तेव्हा या आद्य गुरुचे स्मरण करुन 'एक मूल एक झाड' अशी संकल्पना आपल्या देशात राबविल्यास तापमानाची तीव्रता, पर्यावरणाचे असंतुलन निश्चितच टाळता येईल. हीच खऱ्या आद्य गुरुस गुरुदक्षिणा ठरेल. ईश्वराचे सगुण रुप म्हणजे गुरु आणि गुरुंचे निर्गुण रुप म्हणजे ईश्वर, अशी अनेक वैशिष्ट्ये गुरुंबद्दल सांगता येतील.

मातृदेवोभव, पितृदेवोभव, आचार्यदेवोभव! सर्वसाधारण बुद्धी असलेल्या मनुष्यप्राण्याचे सुसंस्कारित मानवात रुपांतर करण्याचे कार्य गुरु करतात. आई-वडिलांकडून मुलांवर चांगले संस्कार केले जातात, पण विशेष संस्कार गुरुंकडून प्राप्त होतात. संगीत ही गुरुमुखी विद्या आहे. संगीतक्षेत्रात किंवा अन्य कोणत्याही कलाक्षेत्रात गुरुंचे महात्म्य फार मोठे आहे.

पुस्तकांच्या आधारे संगीतकला किंवा इतर कोणतीही कला आत्मसात करता येत नाही. त्यासाठी गुरुंच्या प्रत्यक्ष समोर बसून प्रत्येक स्वराची कंठात मांडणी करावी लागते. स्वराची गोलाई, स्वराची दीर्घता, स्वराची आर्तता आत्मसात करावी लागते. त्यासाठी शिष्यांमध्ये प्रामाणिकपणा, शिस्त, संयम, चिकाटी, मेहनत, श्रद्धा व निष्ठा असावी लागते.

गायन, वादन, नृत्य या सर्व क्षेत्रांमध्ये गुरुला वंदन केल्याशिवाय शिक्षण किंवा प्रस्तुती होत नाही. त्यातली अध्यात्मिक बाजू म्हणजे गुरुंचा आशीर्वाद किंवा गुरुबळ हे होय. संगीत क्षेत्रातील संस्थामुळे तसेच क्षेत्रातील तपस्वी साधकांमुळे समाजातील अप्रगट व सुप्त गुण असलेल्या कलावंतांचा शोध लागत असतो आणि अशा भारतात असलेल्या ज्येष्ठ व श्रेष्ठ गुरुंमुळे व्यक्तीमनातील कलानिर्मितीच्या व कलास्वादाच्या बीजांवर फुंकर घालून ती फुलवली जात असतात. त्यांच्या कलासाधनेतून जगातील आनंदाचे आवार विस्तीर्ण होत जाते. समाजाची रसज्ञता प्रगल्भ करण्याऱ्या, वाढविणाऱ्या, संगीताच्या गोडीचे बीजारोपण करणाऱ्या तपस्वी तसेच मातृत्व, पितृत्व, दातृत्व असलेल्या गुरुंशिवाय ज्ञान नाही.

शिक्षकांकडे, प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा, उच्च माध्यमिक शाळा, महाविद्यालयात किंवा संगीत वर्गात जाणारा विद्यार्थी फक्त कानसेन होऊ शकतो. शिक्षकांकडे तो संगीत विद्येत परंगत होऊ शकत नाही तर त्याला जुजबी ज्ञान मिळू शकते. गाणे कसे ऐकावे हे कळते. पण गाण्यात पारंगत व्हयचे असेल तर योग्य गुरुकडे जाणे क्रमप्राप्त ठरते. तिथे स्वरांची ओळख होते, थोडे रागांचे ज्ञान होते. नक्की गाणं काय आहे हे किंचित कळायला लागते. जास्तीत जास्त विद्यार्थी वर्गाचा कल सुगम संगीताकडे, सिनेसंगीताकडे, लोकगीताकडे असतो कारण त्यांच्या बुद्धीप्रमाणे त्यांना तो प्रकार सोपा वाटतो. म्हणूनच आजकाल जास्तीत जास्त मैफिली भरगच्च श्रोतावर्गाबरोबर सुगम व सिनेसंगीताच्या होताना दिसतात. थोडेफार स्वरांचे ज्ञान झाले, रागाची ओळख झाली की विद्यार्थ्यांना आपण पारंगत झाल्यासरखे वाटते आणि युट्यूबवरुन, नेटवरुन सिनेमाची गाणी शिकून त्याची वेडीवाकडी प्रस्तुती सुद्धा ते करीत असतात. पण माझे असे मत आहे की सुगम संगीत किंवा सिनेसंगीत या प्रकारांचा दर्जा देखील अतिशय उच्च स्तराचा आहे. मला वाटते की शास्त्रीय संगीतानंतरची पायरी सुगम संगीताची आहे त्यामुळे शास्त्रीय संगीताचा पाया भक्कम झाल्यावर आपण कोणत्या क्षेत्रात जायचे ते ठरवायला हवे. सुगम संगीतात शब्दाचे उच्चार, प्रत्येक शब्दातील सूक्ष्म भाव, स्वरांचे बारकावे, सुक्ष्मता ओळखून सादर करावे लागते. तीन मिनिटात सादर करण्याचे कसब लागते. आवाजाची फेक, शब्दांचा उच्चार, भाव याचा विचार असवा लागतो. कला कुठलीही असली तरी त्यामध्ये जोवर अचूकता येत नाही तोवर ती कला सिद्ध होत नाही, मग संगीत असो, नृत्य असो, नाटक असो, वादन असो, चित्रकला असो. ती अचूकता आणण्यासाठी, साधण्यासाठी योग्य गुरुची आवश्यकता असते, कारण गुरु तुमच्यातील गुणांना पैलू पाडतो. त्याही उपर एखाद्या विद्यार्थ्याला आवड आणि ध्यास असला तेव्हा तो योग्य गुरुच्या शोधात असतो. आपली क्षमता, आवाज, आवाजाचे गुणधर्म हे समजून विद्यार्थ्यांनी गुरुंचा शोध घ्यावा. कारण

सब धरती कागज करूँ,
लिखनी सब बन राय।
सात समुद्र की मसि करूँ,
गुरु गुण लिखा न जाय॥

म्हणजे साऱ्या पृथ्वीला कागद म्हटले, जंगलाची लेखणी केली आणि साता समुद्रांची शाई करुनही गुरुचे गुण लिहिता येत नाही. त्यांचे गुण, त्यांचे महात्म्य ही अनुभवण्याची गोष्ट आहे. त्यासाठी तसे गुरु लाभावे लागतात. शेवटी 'गुरु बिन ज्ञान नही' हेच खरे.

आजच्या विज्ञान युगात रेडियो, ध्वनीमुद्रण, कॅसेट, सीडीज अशा वेगवेगळया साधनांचा आपण हवे तेव्हा, हवे ते ध्वनीमुद्रित करण्यासाठी व ऐकण्यासाठी उपयोग करतो. संगीत शिकण्यासाठीही विज्ञानाचा उपयोग होतो आहे. संगीताचे ऑनलाईन वर्ग सुरु झाले आहेत. ती एक सोय आहे. ऑनलाईन क्लासेसमुळे सगळयांना सगळे सोपे वाटू लागले आहे. तरी गुरुकडून प्रत्यक्ष शिकण्याची गरज आहे.

ज्ञान विज्ञानानी पारिपूर्ण असा मानव नित्यनेमाने हजारो लाखोंनी नवीन प्रयोग करत असतो त्यातील काही प्रयोग त्याच्या दैनंदिन जीवनातील अनुभव होतात. उदा. आजच्या दैनंदिन जीवनात मोबाइल हे यंत्र हे अविभाज्य भाग झाला आहे, आपण त्यावर अतिशय अवलंबून झालो आहोत. मोबाईल नसेल तर कामे अडतात, माणूस असहाय्य होतं. पण मोबाईल नव्हता तेव्हा माणूस आपल्या सोयीने आणि त्याच्या स्मृतीचा योग्य वापर करायचा आणि बुद्धिचातुर्याने वापर करायचा. आज मात्र तसे नाही.

संगीत विज्ञानच आहे. पण त्याच्या क्रियात्मक ज्ञानाच्या अभावाने त्याची सृजनशीलता पटवून देण्यासाठी अधिक सखोल संशोधनाची गरज आहे. वैज्ञानिकांनी याकडे लक्ष द्यायला हवे आहे. आकाराकडून साकाराकडे जाणे गरजेचे आहे. उदा, 'सा' ची फ्रिक्वेंसी शोधली आहे पण प्रत्येक रागाप्रमाणे त्याची शुद्धता, गोलाई, रस, भाव, आर्तता बदलते. त्यामुळे अमुकच 'सा' अचूक असे म्हणता येत नाही. नादाच्या भव्य-दिव्य स्वरुपावर मात्र संशोधन झाले नाही. नाद हा आयुष्यातील महत्त्वाचा घटक आहे पण त्याच्या विज्ञानाकडे मात्र अजून कोणी फारसे लक्ष दिले नाही. नादाची शक्ती ज्या दिवशी वैज्ञानिक दृष्टीने संशोधक समजून घेतील किंवा त्यासाठी संशोधन करतील त्या दिवशी आपल्याला संगीतातील क्रियात्मकता कळेल. तेव्हाच संगीताची सत्ता सारीकडे रहिल. लोकांना त्याची शक्ती कळेल. पण अशी साधने निर्माण होऊनदेखील संगीताच्या क्षेत्रात गुरुचे स्थान उच्च शिखरावरच आहे. गुरु हा शिष्याला आपल्यासमोर बसवून संगीताचे ज्ञान देतो. सोबतच संगीताचे संस्कारही करतो. एखाद्या शिष्याद्वारे कलाकृती निर्माण होण्यासाठी, कलाविष्कार घडण्यासाठी शिष्याबरोबरच गुरुचे कष्टही महत्त्वाचे असतात. गायनातील मींड, गमक, खटके, मुरकी, एकेका स्वराची गोलाई, दीर्घपणा, सुरेलपणा, रागशास्त्रानुसार त्याची मांडणी त्याचबरोबर बंदिशींचे सादरीकरण, त्यातील सौंदर्य, शब्दांची फेक अशा महत्त्वाच्या बाबींच्या मार्गदर्शनानेच व स्वतः केलेल्या योग्य साधनेतूनच कलाकराची निर्मिती शक्य होत असते.

पं विष्णू दिगंबर पलुस्करांनी त्यांच्या ओंकारनाथ ठाकूर, पं विनायकबुवा पटवर्धन, पं नारायणराव व्यास या शिष्यांनी त्यांच्या गळयास अनुरुप गायकी दिली. पं भास्करबुवा बखले यांचे दोन प्रसिद्ध शिष्य म्हणजे मा. कृष्णाराव व बालगंधर्व. यापैकी कृष्णारावांना शास्त्रीय वळणाची तालीम दिली, नाट्यसंगीतास अनुकूल असे वळण बालगंधर्वांच्या गळ्याला दिले. मैहरचे उस्ताद अल्लाउद्दिन खां यांनी पं रविशंकर, उस्ताद अली अकबर खां, पं पन्नालाल घोष, कन्या अन्नपूर्णा शंकर यांना त्यांनी त्यांच्या वाद्यांच्या वैशिष्ट्यानुसार वादनकला शिकवली. प्रत्येकाच्या गळयाप्रमाणे त्याची गुणवत्ता जाणून संगीताचे संस्कार करणे गरजेचे असते.

मला माझाही अनुभव नमूद करावासा वाटतो. माझ्या गुरु पद्मभूषण प्रभाताई अत्रे. त्यांच्याकडे माझे सांगितिक शिक्षण गुरु-शिष्य परंपरेने सुरु झाले. त्यांनी दोन वर्षे फक्त 'यमन' राग शिकवला. त्या मला नेहमी म्हणत, "यमन रागावर खूप मेहनत करता आली तर बरंच काही चांगले गाऊ शकशील." त्यावेळेस असे वाटायचे की फक्त यमनच किती वेळा गाऊ? आणि कसा गाऊ? कंटाळा येऊ लागला. पण जसे जसे गळ्याचे सामर्थ्य वाढले तसे यमनची अखंडता, विशालता, समृद्धी समोर दिसू लागली. एकएक स्वरावर कल्पनेचे वर्तुळ तयार करताना मनातून आनंद, समाधान आणि भक्तीचा अनुभव होऊ लागला.

नागपूरला स्थायिक झाल्यावर पं मधुसुदन ताम्हणकर गुरुजींकडे संगीताचे शिक्षण घेत असताना याच 'यमन' रागाची एक वेगळी अनुभूती आली. ते नेहमी सांगत 'ज्या भक्तीने देवाला गंध लावतेस, त्याच भक्तीने कंठातून स्वर लाव.' तीव्र मध्यम लावताना ते म्हणायचे, 'दगडावर दगड घासताच निघणाऱ्या ठिणगीचे उदाहरण लक्षात घेऊन तीव्र मध्यम लाव.' खरेच किती सुंदर उपमा त्यांनी यमनच्या त्या तीव्र मध्यमाला दिली! आजही गाताना, रियाज करताना गुरुंच्या या गोष्टी लक्षात असतात. दिवंगत पं रमेश राजहंस गुरुजींकडे शिकत असताना बंदिशीतील शब्दांचे आत्मिक, भावनिक प्रयोग कसे करायचे याचे दर्शन घडले. प्रत्येक शब्दाचे उच्चारण, फेक, प्रस्तुती अशी असली पाहिजे की त्यातून रसिकश्रोत्यांना नकळत त्यांच्या दृष्टीसमोर संपूर्ण चित्रदर्शन सोहळ्याची अनुभूती झाली पाहिजे असे ते सांगायचे.

गायकीचे धडे घेत असतानाच त्याचे शास्त्र जाणून घेणे अत्यंत गरजेचे असते. त्यासाठी मला नागपुरातील श्रेष्ठ गुरु पं नारायणराव मंगरुळकर लाभले. शास्त्राप्रमाणे प्रत्येक रागातील प्रत्येक स्वराची मांडणी कशी असली पाहिजे, रागप्रकृतीप्रमाणे कोणते सवरसमूह महत्त्वाचे, कोणत्या कण स्वरांचा प्रयोग महत्त्वाचा, कोणता स्वरसंवाद महत्त्वाचा, त्याचे चलन कसे असायला पाहिजे, कुठले रागांग रागाची ओळख देतात, रागाची शुद्धता, अखंडता कायम ठेवतात आदी महत्त्वाच्या बाबींवर मार्गदर्शन केले. ते नेहमी म्हणत असत, "प्रत्येक राग गात असताना त्या रागाच्या सौंदर्याबरोबरच त्याचे शास्त्र, त्याची शुद्धता कायम ठेवली पाहिजे. तेव्हाच रागाविष्कार घडू शकतो."

भारतीय शास्त्रीय संगीत क्षेत्रात, विशेषतः गायनाच्या क्षेत्रात ज्या गुरुंचे योगदान अतुलनीय आहे त्यात गानसरस्वती पद्मविभूषण किशोरी अमोणकर, पं जसराज, डॉ. प्रभा अत्रे, पं मल्लिकार्जून मन्सूर, पं संगमेश्वर गुरव, उस्ताद मश्खूर अली खां साहेब, पं अजय चक्रवर्ती यांच्यासह अनेक कलाकार आहेत. अशा कलाकारांनी गुरु-शिष्य परंपरेने आपल्या घराण्यानुसार शिष्यवर्ग तयार केला. आज ते समाजात भारतीय शास्त्रीय संगीताचा प्रचार-प्रसार करीत आहेत. त्याचबरोबर अशा गुरुंचा आवर्जून उल्लेख करावासा वाटतो ज्यांनी प्रसिद्धी व कला प्रस्तुतीच्या मागे न लागता सातत्याने शिष्य घडवण्याचे अनमोल कार्य केले व सतत भारतीय संगीताच्या प्रचार-प्रसाराचे कार्य करीत आहेत, केले आहे.

पं मधुसुदन ताम्हणकर, पं रमेश राजहंस, पं नारायणराव मंगळूरकर, पं प्रभाकरराव खर्डेनवीस, पं श्यामसुंदर खर्डेनवीस, पं सौ मीना राव, पं सुभाष कशाळकर, पं प्रभाकर देशकर, पं प्रभाकर धाकडे, पं बाळ पुरोहित या पिढीच्या सगळ्या गुरुंनी विद्यार्थ्यांना गुरु-शिष्य परंपरेने आलेले खरे ज्ञान दिले होते, देत आहेत. पारंपारिक रागांची शुद्धता, स्वरांची शुद्धता ठेवत त्यांनी ज्ञान दिले. गुरु-शिष्य परंपरेने शिकताना प्रत्येक गुरु प्रत्येक स्वर, त्याचा दर्जा, त्याची गोलाई, त्याची शुद्धता, स्वरलगाव कायम ठेवून शिष्याच्या गळ्यातून उतरवून घेतो. अलीकडे आधुनिक तंत्रज्ञान म्हणजे, युट्युब किंव तत्सम ॲप्सवरुन संगीताचे वर्ग चालतात. तेव्हा ही शुद्धता जपायची असेल तर विद्यार्थ्यांनी सद्सद्विवेक बुद्धी वापरणे गरजेचे आहे. कारण संगीत ही गुरुमुखी विद्या आहे. उदा. भारतरत्न पं भीमसेन जोशींवरील 'स्वरभास्कर' पुस्तकात पंडितजींनी आपल्या मुलाखतीत सांगितले आहे की त्यांचे गुरु पं रामभाऊ कुंदगोळकर (सवाई गंधर्व) यांनी एक वर्ष फक्त ऐकायला लावले आणि एक वर्ष फक्त षड्ज गिरवायला लावला. यातून स्वराच्या पक्केपणाचे आणि शुद्धतेचे व अचूकतेचे महत्त्व अधोरेखित होते. नंतर

अनुषंगाने एक-एक राग घेऊन त्यांची तालीम सुरु केली. पण आज अशी शोकांतिका आहे की प्रत्येक विद्यार्थ्याला गाणे शिकण्याची आवड तर असते पण कलाकार होण्याची घाई खूप असते आणि वेळ कमी! कमी वेळात खूप चांगले गाणे यावे अशी इच्छा असते, गाण्याबरोबरच इतरही कला याव्या असेही वाटते. हे सगळे करण्याच्या गडबडीत कलेची एकही बाजू साधत नाही. अशा परिस्थितीत भारतीय शास्त्रीय संगीताची शुद्धता कायम ठेवणे अतिशय कठीण झाले आहे.

संगीत शिक्षणाची पद्धत पारंपरिक असो की आधुनिक गुरुशिवाय ज्ञान मिळणार नाही हे खरेच. तेव्हा संत कबीर म्हणतात,

"जो गुरु बसै बनारसी,
शीष समुन्दर तीर।
एक पलक बिखरे नहीं,
जो गुण होय शारीर॥

गुरुचा निवास वाराणसीला असेल आणि शिष्य समुद्राच्या निकट असला तरी जो गुरुला एक क्षणही विसरणार नाही त्या शिष्याच्या शरीरात गुरुचा गुण येतोच. म्हणजे आजच्या बाबतीत बोलायचे तर दोष तंत्रज्ञानाचा नाही तर शिष्य किती सजगपणे शिकतो हा आहे.

गुरुंचे गुण, त्यांचे महात्म्य ही अनुभवण्याची गोष्ट आहे. अशा श्रेष्ठ गुरुंना शतशः नमन.

**संदर्भ:**

१) संगीत विशारद
२) राग विशारद
३) गानतपस्विनी किशोरी अमोणकर
४) स्वर भास्कर